# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ३ जून, २०२२

---

जळगाव दि. ३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पारेषण संलग्न सौर उर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असून उद्या शनिवार दि.४ जून रोजी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याहस्ते प्रकल्प उभारणीस प्रारंभ होणार आहे.

जळगाव जिल्हा नियोजन व विकास समितीने या ६५० किलोवॅट सौर उर्जा प्रकल्पासाठी ३ कोटी ६६ लाख ७१ हजार ९६० रुपयांचा निधी दिला आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील व जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी या प्रकल्पासाठी सहकार्य केले आहे. या प्रकल्पाचा उभारणी सोहळा उद्या शनिवार दि. ४ जून रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठात आयोजित करण्यात आला आहे. यावेळी पालकमंत्री श्री. गुलाबराव पाटील उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी राहतील. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत तसेच प्रभारी प्र-कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे उपस्थित राहतील. महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (मेडा) ही या प्रकल्पासाठी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहत आहे अशी माहिती प्रभारी कुलसचिव प्रा. किशोर पवार यांनी दिली.

---

## बातमी क्र. २

जळगाव दि. ३ (प्रतिनिधी) " सायकल चालवा व पर्यावरण वाचवा" असा संदेश कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे यांनी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने जागतिक सायकल दिनानिमित्त आयोजित सायकल रॅलीला झेंडा दाखवितांना दिला.

यावेळी प्रभारी कुलसचिव प्रा.किशोर पवार, परीक्षा मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. दीपक दलाल, जिल्हा सायकलींग असोसिएशनचे अध्यक्ष महेश सोनी, रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे उपस्थित होते. प्रा.इंगळे पुढे म्हणाले की, वाढत्या प्रदुषणामुळे पर्यावरणाचा असमतोल होत असून मोठया प्रमाणावर ऱ्हास होत आहे. सायकलचा वापर मोठया प्रमाणात केल्यास इंधन बचत होऊन प्रदुषणास आळा बसेल आणि सायकल चालविल्याने शरीरालाही फायदा होईल. त्यामुळे सर्वांनी सायकलचा वापर करुन निसर्ग वाचवावा असे आवाहनही केले. प्रास्ताविक करतांना संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी सांगितले की, जागतिक सायकल दिन व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या निमित्ताने जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यामध्ये प्रत्येक ठिकाणी रासेयोचे ७५ स्वयंसेवक उपस्थित होते. प्रा.इंगळे यांनी हिरवी झेंडी दाखवून सायकल रॅलीचा प्रारंभ केला. या सायकल रॅलीमध्ये सहायक कुलसचिव एन.जी.पाटील, डॉ. दीपक सोनवणे, समीर रोकडे, वैशाली शर्मा, रुपेश महाजन, स्वप्नील मराठे, इरफान पिंजारी, सुनील चौधरी, निलेश चौधरी, संभाजी पाटील, अरुण सपकाळे, चंदन मोरे, आकाश भामरे, नरेंद्र पाटील, विलास पाटील, अक्षय महाजन, नितीन चौधरी, विजय बिऱ्हाडे, रासेयो स्वयंसेवक व सायकलपटूंचा समावेश होता. सूत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी